# जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी
## (पुरवठा विभाग)
## (जाहिरात प्रसिध्दी दुसरी वेळ)

**परभणी जिल्हयात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकिय संदस्याची नियुक्ती करणे बाबत.**

शासन निर्णय क्रंमक ग्राराप-१०१३/प्र.क्र.१९९/ग्रास-२ दिनांक १९ आक्टोबर २०१३ अन्वये महाराष्ट्र शासन व त्यांचे वतीने जिल्हाधिकारी परभणी हे ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६च्या कलम ७ व ८ नुसार ग्राहकांच्या अधिकाराचे सवंर्धन व संरक्षण करण्यसाठी जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद स्थापन करावयाची आहे.

**अशासकिय सदस्याच्या निवडीसाठी शासनाने मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील समिती गठीत करण्यात आली आहे.**

**१.पोलीस अधिक्षक सदस्य**
**२.जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष सदस्य**
**३.जिल्हा पुरवठा अधिकारी निमंत्रक**

**सदर परिषदेचे काम परिणामकारक होण्यासाठी त्या परिषदावर अशासकीय सदस्याची प्रवर्गनिहाय खालील प्रमाणे नियुक्ती करावयाची आहे.**

क जिल्हा परिषदेचे दोन पेक्षा कमी नसतील इतके सदस्य.
ख महारगरपालिका/नगरपरिषदाचे दोन पेक्षा कमी नसतील इतके सदस्य.
ग पंचायत समितीचे दोन पेक्षा कमी नसतील इतके सदस्य.
घ कृषि उत्पन्न बाजार समितीचे दोन पेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी.
ड शाळा/महाविघालयाचे यांचे दोन पेक्षा कमी नसतील इतके सदस्य.
च वैघक व्यावसायांचे दोन पेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी
छ व्यापार व उघोग क्षेत्राचे दोन पेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी
ज पेट्रोल व गॅस विक्रेत्याचे दोन पेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी
झ शेतक-याचे दोन पेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी

निवडीचे निकष:-जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकिय सदस्याची नियुक्ती खालील निकषांच्या अधारे करण्यात येणार आहे.

**ब)जिल्हा परिषदेचे (दोन),महानगरपालिका/नगरपरिषदांचे(दोन),पंचायत समितीचे(दोन), कृषी उत्पन्न बाजार समितीचे (दोन),व शाळा व महाविघालयाचे(प्रत्येकी एक),या प्रवर्गातील अशासकीय सदस्यांसाठी**

१)ग्राहक जनजागृतीसाठी जिल्हयात काम केलेले असावे.
(उदा.प्रशिक्षण,प्रचार,प्रसार,प्रबोधन,प्रसिध्दी,इ.)

२)सारखेच हित संबंध असणा-या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी एकत्रितपणे काम केलेले असावे.

३) ग्राहकांच्या समस्यासंदर्भात सर्वेक्षण व संशोधनाचे कार्य केलेले असावे.

(४)सार्वजनिक संपत्तीचा अपहार कलेला नसावा.

(५) गैरवर्तणुकीसंदर्भात न्यायालयात खटला दाखल होउुन शिक्षा झालेली नसावी.

**क)वैघक व्यवसायाचे (दोन),व्यापार व उघोग क्षेत्राचे (प्रत्येकी एक),पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे (प्रत्येकी एक),**

१)ग्रहकांना चांगल्या गुणवंत्तेची सेवा/माल उपलब्ध होण्यासाठी जागृती,प्रचार व प्रसार केलेला असावा.

२) ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात संस्थेने सर्वेक्षण व संशोधनात्मक कार्य केलेले असावे.

३) सारखेच हितसंबंध असणा-या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्रितपणे कार्य केलेले असावे.

४)ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहकचळवळ या संबंधातप्रशिक्षण,प्रबोधन,प्रचार,प्रसार,प्रसिध्द इत्यादीव्दारे काम केलेले असावे.

५) मीरठीचे व किमान इतर एका भाषेचे उत्तम ज्ञान असावे.

६) गैरवर्तणुकीसंदर्भात खटला दाखल होउुन शिक्षा झालेली नसावी.

७) सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

८) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

**ड) शेतकरी प्रतिनिधी (दोन)**

१)स्वत:शेती करणारा असावा.

२)ग्राहक म्हणून शेतक-यांची फसवणूक होऊ नये यासाठी शेतक-यांच्या जागृतीचे काम केलेले असावे

३) शेतक-यांना चांगल्या गुणवत्तेचे बी-मियाणे,खते,ओषधे मिळण्यासाठी काम केलेले असावे.

४) एकसारखे हितसंबंध असणा-या अनेक शेतक-यांच्या तक्रारी/समस्यांचे निवारण करण्याकरीता काम केलेले असावे.

५)गैरवर्तणुकीसंदर्भात खटला किंवा शिक्षा झालेली नसावी.

६) सार्वजनिक संपत्तीच अपहार केलेला नसावा.

७) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी सबंधीत नसावा.

वरील प्रवर्गातील संस्था व व्यक्तीकडून विहीत नमुन्यातील अर्ज मागविण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात येते.तसेच परभणी जिल्हयाच्या संकेतस्थळावर www.parbhani.nic.in जाहिरात व विहित नमुन्यातील अर्ज प्रसिध्द करण्यात येत आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी,परभणी

फोटो

## परिशिष्ट —अ

**राज्य ग्राहक संरक्षण परिषद / जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील नियुक्तीसाठी करावयाच्या अर्जाचा नमूना —**

(१) संस्थेचे/अर्जदाराचे पूर्ण नांव -
(२) पूर्ण पत्ता -
(३) संस्थेचा प्रतिनिधी म्हणून ज्या व्यक्तीस नामनिर्देशित करावयाचे आहे त्या व्यक्तीचे नाव व पत्ता –
दूरध्वनी क्रमांक
भ्रमणध्वनी क्रमांक
ईमेल
(४) वय —
(५) शैक्षणिक अर्हता -
(६) व्यवसाय -
(७) प्रवर्ग —
(ज्या प्रवर्गातून नियुक्ती हवी आहे तो प्रवर्ग नमूद करावा.)
(८) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे स्वरुप -
(९) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे कार्यक्षेत्र -
(१०) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचा कालावधी.
केव्हापासून —
केव्हापर्यंत -
(११) किती ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करण्यात आली व कोणत्या बाबीबद्दल ?
(१२) वरील कार्यामुळे किती ग्राहकांना नेमका काय फायदा प्रत्यक्षात झाला आहे ?
(१३) वरील कार्यात उपलब्धीच्या वैशिष्टयपूर्ण बाबी व त्याकरिता मिळालेले पुरस्कार/ पारितोषिक, इ.
(१४) आपली निवड वरील परिषदेवर झाल्यास आपले काय योगदान राहील व कशाप्रकारे ? (एका परिच्छेदात नमूद करावे.)
(१५) सोबत जोडलेले पुरावे / कागदपत्रे.

---

मी श्री / श्रीमती .................................................. प्रमाणित करतो की, अर्जात नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे. मी आणखी असे मान्य करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोटया माहितीच्या आधारे मिळविलेली नियुक्ती रद्द होण्यास व फौजदारी कारवाईस मी पात्र राहीन. त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहाणार नाही.

दिनांक - अर्जदाराची स्वाक्षरी

स्थळ - अर्जदाराचे नाव —